# कामगार विभाग

## १.सीआर/६९/पुणे/२०१५

तक्रारदार यांचा निरनिराळया कारखान्यांचे बा पके (बॉयलर) दुरुस्ती व देखभालीचा व्यवसाय आहे. आरोपी लोकसेवक संजय मधुकरराव सरोदे, वय—५५ वर्षे, सह संचालक, कामगार विभाग, स्टिम बॉयलर्स, महाराष्ट्र शासन, पुणे यांचेकडे बाष्पकाचे निरीक्षण करुन त्यांना प्रमाणपत्र देण्याचे काम सोपविलेले आहे. तक्रारदार यांचेकडे असणा.या दोन कंपन्याना बांष्पकांचे निरीक्षण करुन त्यांचे प्रमाणपत्र देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे रु.५०,०००/— लाचेची मागणी केली. तक्रारदार यांची आरोपी लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने ॲन्टी करप्शन ब्युरो,पुणे येथे तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने सापळा कारवाईचे आयोजन केले असता लोकसेवक संजय मधुकरराव सरोदे, सह संचालक, कामगार विभाग, स्टिम बॉयलर्स, महाराष्ट्र शासन, पुणे यांनी तक्रारदार यांचेकडे रु. ५०,०००/— लाचेची मागणी करुन तडजोडी अंती सदर लाच रक्कम रु. ४०,००० /— आरोपी लोकसेवक यांना फोन करुन नंतर त्यांचे घरी आणुन दयावेत असे ठरले. लोकसेवक यांचे मागणीप्रमाणे आरोपी लोकसेवक यांचे रहाते घरी सापळयाचे आयोजन करणेत येवुन लाच रक्कम रु.४०,०००/— स्विकारताना रंगेहाथ पकडणेत आले असुन पंचासमक्ष लााच रक्कम रु. ४०,०००/— हस्तगत करण्यात आलेले आहेत

सदरबाबत सहकारनगर पो.स्टे., पुणे शहर, भाग—६, गु.र.नं. ३०१६/२०१५, ला.प्र.का.क ७, १३(१)(ड) सह १३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यांत आलेला आहे. आरोपी लोकसेवक यांना अटक करण्यांत आलेली आहे.